Dr S.C. Gulhane Prerna College of
Commerce, Science and Arts
Run by Prerna Sewa Mandal
Reshimbag Square, Nagpur-24
Govt Recognized and Affiliated to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University
NAAC (UGC) ACCREDITED INSTITUTION 'B' GRADE (CGPA-2.32)
Ph.: 2745296, 2746840 E-mail: prernacollegengp@gmail.com

## अहवाल
## 'मराठी भाषा दिवस'

समिती — अभ्यासेत्तर उपक्रम समिती आणि भाषा विभागाच्या वतीने
दिनांक आणि वेळ — ०३.०३.२०२५ सकाळी ११.००वाजता
स्थळ — डॉ. एस. सी. गुल्हाने प्रेरणा वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, नागपूर
अध्यक्ष — डॉ. प्रविण जोशी
प्रमुख अतिथी — डॉ. कोमल ठाकरे
प्रमुख उपस्थिती — प्राचार्या रत्ना सरकार
भाषा विभाग प्रमुख — स्नेहल राखुंडे
अभ्यासेत्तर उपक्रम समिती प्रमुख — नेहा समुंद्रे
निंबध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी — ०७
निबंध स्पर्धेतील विजेते — प्रथम मुस्कान छत्रे, द्वितीय यशश्री रामटेककर, तृतीय पोर्णिमा श्रीनाथ
पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण — डॉ. कोमल ठाकरे, डॉ. प्रविण जोशी
कार्यक्रम समन्वयक — ज्योत्स्ना चन्ने
सूत्रसंचालन, आभार — ज्योत्स्ना चन्ने

**मराठी भाषा निबंध स्पर्धा** — ही महाराष्ट्राची मातृभाषा असून, तिच्या जतन आणि संवर्धनासाठी दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिवस साजरा केला जातो. हा दिवस विख्यात कवी, नाटककार आणि साहित्यिक विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. त्या निमित्याने निबंध स्पर्धेचे आयोजन केले. त्यात तीन विद्यार्थी बक्षिसाचे मानकरी ठरले. प्रथम पुरस्कार मुस्कान छत्रे बीएससी आयटी प्रथम वर्ष, द्वितीय पुस्कार यशश्री रामटेककर बीएससीएस, तृतीय पुरस्कार पोर्णीमा श्रीनाथ बीकॉम द्वितीय वर्ष डॉ. कोमल ठाकरे सरांचे हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.

**मराठी भाषा दिवसाचे उद्दिष्टे**

१. मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रसार – मराठी भाषेचा वापर वाढवणे आणि तिचे जतन करणे.

२. मराठी साहित्याचा प्रचार व प्रसार — महान साहित्यिकांच्या कृतींचे वाचन आणि सादरीकरण प्रोत्साहित करणे.

३. मराठी भाषेचा अभिमान जागृत करणे — विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात मराठीबद्दल प्रेम व आदर निर्माण करणे.

४. मराठी भाषा टिकवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर — डिजिटल युगात मराठी भाषा

जपण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे.
५. मराठी भाषा हा आपला अभिमान आहे, तिचे जतन आणि वृद्धी करणे आपले कर्तव्य आहे!

**मराठी भाषा दिवस कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये**

१. दीपप्रज्वलन आणि सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात परंपरागत पद्धतीने केली.
२. प्रमुख अतिथींचे भाषण — मराठी भाषेचे महत्त्व आणि तिच्या संवर्धनाविषयी मार्गदर्शन.
३. निबंध स्पर्धा — मराठी भाषेचे महत्व
४. पारितोषिक व प्रमाणपत्र वितरण — पुरस्काराचे मानकरी प्रथम पुरस्कार मुस्कान छत्रे बीएससी आयटी प्रथम वर्ष, द्वितीय पुस्कार यशश्री रामटेककर बीएससीएस, तृतीय पुरस्कार पोर्णीमा श्रीनाथ बीकॉम द्वितीय वर्ष डॉ. कोमल ठाकरे सरांचे हस्ते पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले.
५. मराठी भाषा जतन करण्याची शपथ — सर्वांनी मराठीत अधिकाधिक संवाद साधण्याची प्रतिज्ञा घेतली.

या कार्यक्रमामुळे मराठी भाषेचा गौरव आणि विद्यार्थ्यांमध्ये तिच्याबद्दलचा अभिमान वाढला.

**मराठी भाषा दिवस कार्यक्रमाचे निष्कर्ष (परिणाम)**

१. मराठी भाषेचा अभिमान वाढला — विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेबद्दल आत्मीयता आणि अभिमान निर्माण झाला.
२. मराठी साहित्याची ओळख — विद्यार्थ्यांना कुसुमाग्रज, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, पु. ल. देशपांडे यांसारख्या थोर साहित्यिकांच्या साहित्याची ओळख झाली.
३. मराठी संभाषणाला प्रोत्साहन — कार्यक्रमामुळे महाविद्यालय आणि संस्थेमध्ये मराठीतून अधिकाधिक संभाषण करण्यावर भर दिला गेला.
४. तंत्रज्ञान आणि मराठीचा संगम — डिजिटल माध्यमांतून मराठी भाषा टिकवण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.
५. मराठी भाषा संवर्धनाची शपथ — सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याची प्रतिज्ञा घेतली.

मराठी ही केवळ भाषा नसून, ती आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे यांसाररख्या थोर साहित्यिकांनी मराठी भाषेला समृद्ध केले आहे. आजच्या काळातही मराठी भाषेचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे.
या कार्यक्रमामुळे मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रचार—प्रसार करण्याची प्रेरणा मिळाली आणि पुढील पिढीमध्ये मराठीची गोडी वाढली.

**एकुण विद्यार्थी संख्या — ७७**





विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. कोमल ठाकरे